REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | JULY - 2025

# भारतातील सूफी पंथाचा धर्मप्रसार आणि तत्वज्ञान

**प्रा. प्रमोद कमलाकर नरखडे**
**इतिहास विभाग, दे.सं. गरड महाविद्यालय, मोहोळ. ता. मोहोळ,जि. सोलापूर.**

## प्रस्तावना -



मध्ययुगीन भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासात सूफी पंथाला महत्त्वाचे स्थान आहे. इस्लाम धर्मातील ही काहीशी गुढ अशी ही परंपरा आहे. कर्मकांडाला महत्व न देता ईश्वराशी आपले नाते जोडले पाहिजे, या भूमिकेतून आत्मशुद्धी, मानवसेवा व अध्यात्मिक साधना या गोष्टीला या पंथात विशेष स्थान आहे. सूफी पंथ भारतात आल्यानंतरच इस्लामाचा आध्यात्मिक प्रसार भारतात झाला आणि भारतीय परंपरेची सूफी पंथ जोडला गेला. भारतातील सूफी पंथाचा विकास ही केवळ धार्मिक बाब नाही तर ती भारतीय इतिहासाशी जोडलेली आहे. भारतीय सूफी पंथ हा अध्यात्म आणि संस्कृती यांचा सुंदर संगम आहे. ईश्वरभक्ती आणि मानवतेचा संदेश देऊन भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्याचे काम सूफी पंथाने केले.

सूफी हा शब्द अरबी भाषेतील सूफ म्हणजे 'लोकरीचे वस्त्र' या शब्दापासून तयार झाला आहे. कारण सुरुवातीला साधेपणाचे प्रतीक म्हणून हे लोक लोकरीचे कापड परिधान करत असतात. इस्लाम धर्मातील गुढवादी प्रवासातून या पंथाचा उगम झाला. प्रेममार्गाने ईश्वराशी एकरूप होणे, हे या पंथाचे मुख्य ध्येय होते. 12 व्या शतकाच्या शेवटी व 13 व्या शतकाच्या सुरुवातीला सूफी संत भारतात आले. अजमेर येथे त्यांनी आपले केंद्र बनविले. स्थानिक लोकांशी जुळवून घेतल्यामुळे त्यांचा प्रभाव कायम राहिला.

## 1. सूफी पंथाची संकल्पना -

सूफी या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल विविध मते आढळतात. सूफी म्हणजे लोकरीचे वस्त्र यातून साधेपणा जपला जातो. हा एक अर्थ अभिप्रेत आहे. संसारापासून अलिप्त राहून ईश्वराला प्रेमाने जवळ करणे हा त्यांचा प्रारंभिक हेतू होता. ईश्वराचा अध्यात्मिक अनुभव घेणे, हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू होता. केवळ बाह्य

धार्मिक आचारावर भर न देता अंतकरण शुद्ध करून मानवसेवा केली तर ईश्वर प्राप्ती लवकर होते. त्यांच्या या मानवतावादी भूमिकेमुळे सामान्य लोकांशी त्यांची नाळ लवकर जुळली.

## 2. भारतात सूफी पंथाचा प्रवेश -

भारतामध्ये इस्लामाचा प्रवेश विशेषतः राजकीय हेतूने झाला होता आणि त्याचबरोबर सूफी साधूही भारतात आले. 13 व्या शतकापासून सूफी साधू भारतात येऊन विविध प्रांतात धर्मप्रसाराचे कार्य करू लागले. शहरांबरोबर ग्रामीण भागातही त्यांनी आपले काम सुरू केले. 'खानकाह' या अध्यात्मिक केंद्राच्या माध्यमातून ते लोकांशी संपर्क साधू लागले. या केंद्राच्या माध्यमातून अध्यात्मिक साधन आणि गरजू लोकांची सेवा केली जात असे.

## 3. भारतातील प्रमुख सिलसिले

भारतामध्ये अनेक सूफी परंपरा पाहायला मिळतात. त्यापैकी काही प्रमुख सिलसिल्यांची माहिती आपण घेऊया.

### 3.1. चिश्ती सिलसिला -

भारतीय लोक जीवनावर सर्वात जास्त प्रभाव पाडणाऱ्या सूफी परंपरेपैकी चिश्ती सिलसिला ही एक महत्त्वाची परंपरा आहे. ख्वाजा मोईनुद्दिन चिश्ती याने अजमेर येथे ही परंपरा सुरू केली. आणि या परंपरेला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. त्यानंतर चिश्तीपरंपरेतच कुतुबुद्दीन बख्तियार काकी, बाबा फरीद, निजामुद्दीन औलिया आणि नसिरुद्दीन चिराग-ए-दिल्ली यासारख्या संतांनी आपापल्या परीने या परंपरेचा विस्तार केला.

चिश्ती परंपरेतील या सूफी साधूंनी प्रेम, दया, मनसेवा आणि साधेपणा याला विशेष महत्त्व दिले. सामान्य जनतेबरोबर ते अगदी मिळून मिसळून वागत असत.

### 3.2 कादिरी सिलसिला -

हा सुफी परंपरेतील महत्त्वाचा अध्यात्मिक पंथ आहे. त्याची सुरुवात बगदाद मधील सूफी संत शेख अब्दुल कादिर जिलानी यांनी यांच्या नावाशी जोडली जाते. हा सिलसिला पुढे भारतासह अनेक देशात पसरला. त्याचे प्रमुख कार्यक्षेत्र बगदाद होते. त्यांच्या शिकवणीत कुराण, इस्लामी धार्मिक आचार, अध्यात्मिक शुद्धता आणि ईश्वर प्रेम यांना महत्त्व होते. हा सिलसिला भारतात दख्खन, पंजाब, गुजरात आणि उत्तर भारतात काही भागात प्रभावी होता. त्यांची तत्वे पुढीलप्रमाणे होती. ईश्वरावरील श्रद्धा दृढ करणे, भक्ती आणि प्रेमाच्या माध्यमातून ईश्वराची जवळीक साधणे, अहंकाराचा आणि लोभाचा त्याग करणे, सतत ईश्वराचे स्मरण करणे, गरजू आणि दु:खी व्यक्तींची सेवा करणे आणि अध्यात्मिक गुरुच्या मार्गदर्शनाखाली साधना करणे. कादरी परंपरेत शर्यत आणि अध्यात्मिक साधनेचा समन्वय आहे. आचाराबरोबरच अंतःकरणाच्या शुद्धतेला या परंपरेत खूप महत्त्वाचे स्थान आहे.

### 3.3 सुहरावर्दी सिलसिला -

भारतात जे अनेक सिलसिले होऊन गेले त्यापैकी सुहरावर्दी सिलसिला एक महत्त्वाचा सिलसिला आहे. त्याची स्थापना शेख शहाबुद्दीन सुहरावर्दी यांनी इराक येथे केली. भारतात हा सिलसिला सिंध आणि पंजाब व मुलतान या प्रदेशात प्रभावी होता. शेख बहाउद्दिन जकरिया यांनी सुहरावर्दीचा प्रसार केला. मुलतान येथे त्याचे प्रमुख केंद्र होते. सुहरावर्दी सिलसिला त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. ईश्वर भक्ती आणि अध्यात्म साधनेवर त्यांचा भर होता. इस्लामच्या सर्व नियमांचे पालन करणे महत्त्वाचे समजले जाईल. खानकाहच्या माध्यमातून धार्मिक व सामाजिक कार्य केले जात असे. गरिबांना मदत करणे आणि मानवसेवा करण्यावर विशेष भर होता. सुहरावर्दी संत राजसत्तेशी अलिप्त नव्हते. त्यांचा राजकीय लोकांशी आणि उच्चवर्गीयांबरोबर चांगला संपर्क होता. या बाबतीत त्यांची भूमिका चिश्ती संतापेक्षा काहीशी वेगळी होती. धार्मिक शिक्षणाबरोबर सामाजिक कार्यालाही ते तेवढेच महत्त्व देत असत. सुहरावर्दी सिलसिल्यामुळे भारतात सूफी विचारांचा प्रसार झाला. मध्ययुगीन भारतातील धार्मिक सांस्कृतिक इतिहास समजून घेण्यासाठी या सिलसिल्याचे महत्त्व विशेष आहे.

### 3.4 नक्शबंदी सिलसिला -

मुघल कालखंडात भारतामध्ये या सिलसिल्याचे महत्व वाढले. या परंपरेने इस्लामिक धार्मिक शिस्त आणि अध्यात्मिक साधनेला महत्त्व दिले. नक्शबंदी सिलसिल्याचा संबंध खाजा बहाउद्दीन नक्शबंद बुखारी यांच्याशी जोडला जातो. मध्य आशियातील बुखारा परिसरात प्रसिद्ध सूफी संत होते. त्यांच्या नावावरून या परंपरेला नक्षबंदी हे नाव मिळाले. मुगल सम्राट अकबराच्या काळात हा सिलसिला विशेष प्रसिद्ध होता. खाजा बाकी बिल्लाह यांनी भारतात या सिलसिल्याचा प्रसार केला. त्याप्रमाणे त्यांचा शिष्य शेख अहमद सरहिंद यांनी या विचार भारतात मोठ्या प्रमाणात प्रसारित केला. त्याचप्रमाणे शेख अहमद सरहिंद हे या परंपरेतील सर्वात प्रभावशाली संत मानले जातात. त्यांनी इस्लामाच्या धार्मिक तत्त्वावर विशेष भर दिला. या सिलसिल्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. अल्लाह हा एकमेव ईश्वर आहे. इस्लामी कायदे आणि धार्मिक आचारांचे पालन खूप महत्त्वाचे मानले जाते. ईश्वराचे सतत स्मरण करणे, ही एक महत्त्वाची साधना आहे. मनातील अहंकार, लोभ आणि वासनावर नियंत्रण मिळवण्यावर भर दिला जात असे.

चिश्ती सिलसिला, कादिरी सिलसिला, सुहरावर्ती सिलसिला, नक्शाबंदी सिलसिला असे अनेक सिलसिले भारतातील विविध भागात धर्मप्रसाराचे काम करत होते.

## 4. सूफी तत्त्वज्ञान -

सूफी पंथतात भीतीपोटी नव्हे तर प्रेमाच्या माध्यमातून ईश्वराला प्राप्त करण्यावर भर होता. ईश्वराला प्रियकर मानून त्याची साधना केली जात असे. मनातील अहंकार, लोभ, राग आणि स्वार्थी दूर करून मन निर्मळ करणे, हे साधनेतील पहिले पाऊल होते. यात अध्यात्मिक प्रगतीसाठी गुरुच्या

मार्गदर्शनाची गरज व्यक्त केलेली आहे. ईश्वरभक्तीत लीन होण्यासाठी संगीत आणि काव्याचा भरपूर वापर केला जात असे. जलालुद्दीन रूमी हाफीज आणि अमीर खुसरो यांनी रचलेले काव्य या तत्त्वज्ञानाचा पाया समजला जातो. जाती, धर्म आणि पंथ यापलीकडे जाऊन माणसावर प्रेम करण्याचा संदेश यांनी दिला. ईश्वर म्हणजे मानव सेवा ही त्यांची धारणा होती. सूफी तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीवर विशेषतः भक्ती चळवळीवर आणि संगीतावर मोठा प्रभाव पाडला आहे.

**4.1 एकेश्वर वाद -**

सूफी पणता ते किशोर वादाला खूप महत्त्व आहे. ईश्वर एकच आहे आणि ईश्वराची आध्यात्मिक संबंध प्रस्थापित करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे, असे मानले जात असे.

**4.2 ईश्वर प्रेम -**

सूफी तत्त्वज्ञानात 'इश्क ए इलाही' म्हणजे दैवी प्रेमाला विशेष स्थान होते. भक्ताचे अंतिम ध्येय ईश्वराच्या स्वरूपात आपले अस्तित्व विसर्जित करणे. त्यामुळे ईश्वर प्रेमाला विशेष स्थान होते.

**4.3 आत्मशुद्धी -**

मानवी मनातले जे विकार आहेत अहंकार, देश, मत्सर, यापासून लांब राहून अंतःकरण शुद्ध करणे, आवश्यक आहे. स्वतःचे आत्मपरीक्षण करून अध्यात्मिक उन्नती करण्यावर विशेष भर दिला जात असे.

**4.4 फना आणि बका -**

फना म्हणजे अहंकाराचा आणि स्वत्वाच्या भावनेचा लय होणे आणि बका म्हणजे ईश्वराच्या स्मरणात स्थिर होण्याची अवस्था होय. या दोन्ही गोष्टी पंथात अतिशय महत्त्वाच्या मानल्या जात असत.

**4.5 पीर मूरिद संबंध -**

सूफी पंथात अध्यात्मिक गुरुला पीर म्हटले जायचे आणि शिष्याला मुरीद असे म्हटले जायचे. अध्यात्मिक मार्गावर गुरुची भूमिका अतिशय महत्त्वाची मानली जात असे.

**4.6 जिक्र -**

सतत ईश्वर चिंतनात राहणे म्हणजे जिक्र होय. ईश्वराचे नाव प्रार्थना आणि ध्यान या माध्यमातून एकाग्रता प्राप्त करण्याची आणि एकाग्र ईश्वर चिंतन करणे.

**4.7 मानव सेवा -**

सूफी विचारात मानवसेवेला उच्च असे स्थान आहे. गरीबी, दुःख आणि गरजू व्यक्तींची सेवा करणे म्हणजेच ईश्वराची सेवा केल्यासारखेच आहे, अशी भावना सूफी पंथामध्ये होती.

## 5. सूफी पंथ आणि भारतीय समाज -

भारतातील धार्मिक परंपरेची सूफी पंथाचा संपर्क आला. इतिहासात संत आणि योगी यांच्याबरोबर सूफीचा संवाद झाल्याचे अनेक उदाहरणे सापडतात. पण सर्वच सूफी संतांचे विचार सारखे नव्हते. काही सूफी संतांनी समन्वयाची भूमिका घेतली, तर काहींची धार्मिक भूमिका पूर्ण वेगळी होती. त्यामुळे मध्ययुगीन भारतात भक्ती आणि सूफी परंपरेचा विकास समकालीन सामाजिक वातावरणावर झाला. भारतातील भक्ती परंपरा आणि सूफी पंथाची परंपरा पूर्णपणे समान होत्या, असे म्हणता येणार नाही. दोन्हीही स्वतंत्र अशा धार्मिक भूमिका आहेत. दोन्हीची तात्विक बाजू भिन्न आहे. तरीही परस्पर संपर्कमुळे भारतीय समाजात संवाद आणि संस्कृतिक देवाणघेवाणीची प्रक्रिया बळकट केली.

## 6. सूफी पंथाचे महत्त्व -

सूफी पंथाने इस्लामी अध्यात्मिक विचार सर्वदूर नेला. सामान्य जनतेशी संवाद साधून मानव सेवेला विशेष महत्त्व दिले. विविध धार्मिक समुदायांमध्ये सांस्कृतिक संपर्क वाढविला. लोकसंगीत, काव्य या गोष्टीला चालना मिळाली. दर्गे आणि उरूसच्या माध्यमातून संस्कृतिक जीवनाला आकार दिला. भारतात त्या काळात वेगवेगळ्या भक्तीपरंपरा होत्या, त्या परंपरेची जुळवून घेत सूफी पंथाने भारतात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. भारतातील सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात दखल घेण्याइतपत अध्यात्मिक आणि सामाजिक कार्य सूफी पंथानी केले.

## निष्कर्ष -

भारतातील सूफी पंथ हा मध्ययुगीन भारताच्या धार्मिक आणि संस्कृती इतिहासातील एक महत्त्वपूर्ण प्रवाह आहे. भारतातील सूफी पंथाचा धर्मप्रसार आणि तत्त्वज्ञान या शोधनिबंधांतर्गत पुढील काही निष्कर्ष मांडता येतील.

- इस्लामी आध्यात्मिक प्रसारासाठी सूफी पंतांनी अध्यात्मिक प्रसाराबरोबरच अध्यात्मिक साधना बरोबरच आत्मशुद्धीला महत्त्व दिले.
- मानव सेवा हीच ईश्वर सेवा हे त्यांच्या सूफी पंथाचे मुख्यतत्व होते.
- सूफी संताच्या कार्यामुळे कर्मकांडाचे महत्त्व कमी होऊन अंतकरणाच्या शुद्धीला चालना मिळाली.
- खानकाह, दर्गे, संगीत, काव्य या आणि लोकभाषा यांच्या माध्यमातून सोपी विचार व्यापक समाजापर्यंत पोहोचला.

- सूफी पंथाच्या कार्यामुळे हिंदू मुस्लिम ऐक्याला चालना मिळाली.
- सामाजिक आणि सांस्कृतिक देवाण घेवाण होऊन-सूफीपंथाचा बहुआयामी वारसा भारतात तयार झाला.
- विविध धार्मिक सामुदायांमध्ये सांस्कृतिक संपर्क वाढला.

## संदर्भसूची


- डॉ. रा. चिं. ढेरे - मुसलमान मराठी संत कवी, प्रथम आवृत्ती 1967, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
- डॉ. यु.म. पठाण - मुस्लिम मराठी संत कवी, प्रकाशन वर्ष 2011, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
- डॉ. अ.रा. कुलकर्णी - मध्ययुगीन महाराष्ट्र, प्रकाशन वर्ष 2006 डायमंड पब्लिकेशन, पुणे.
- डॉ. ग.हृ. खरे - महाराष्ट्रातील संत वाङमय
- प्रा. सोपान जावळे – मुगलभारताचा इतिहास, प्रथमावृत्ती 2005, अक्षरलेणं प्रकाशन, ऊर्जानगर, जुनी मिल ,कंपाऊंड, सोलापूर.


## संशोधनाची उद्दीष्टे –

1. भारतातील सूफी पंथाचा प्रसार कसा झाला हे स्पष्ट करणे.
2. भारतातील प्रमुख सूफी सिलसिले – चिश्ती, सुहरावर्दी, कादरी आणि नक्शबंदी यांचा अभ्यास करणे.
3. खानकाह, दर्गे, संगीत व काव्य यासारख्या माध्यमाचा धर्मप्रसारात केलेल्या वापरांचा अभ्यास करणे.
4. सूफी पंथातील ईश्वरप्रेम, एकेश्वरवाद, आत्मशुद्धी, जिक्र, फना-बका या तत्त्वांचा अभ्यास करणे
5. मानवतावादी आणि समन्वयवादी विचारांचा सुफी पंथातील केलेला प्रसार अभ्यासणे.
6. भारतीय समाज व संस्कृतीवर सुफी पंथाचा झालेला प्रभाव अभ्यासणे.
7. सामाजिक ऐक्य आणि शैक्षणितेसाठी सूफी संताचे कार्य समजावून घेणे.
8. भारतीय इतिहासात सोपी पंथाचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करणे.